# पोलीस.

## १.सीआर/१७२/सिधुदुर्ग/१४

फिर्यादी यांचा बांद्रा परिसरामध्ये ट्रॅव्हल्सचा व्यवसाय आहे. त्यांचे भाऊ हे नवी मुंबई पोलीस दलात कार्यरत असून श्रीमती सातर्डेकर यांचेशी त्यांचे  लग्न झालेले आहे. श्रीमती सातर्डेकर यांनी फिर्यादी, त्यांचा भाऊ व बहीण यांचेविरुध्द कल्याण कोर्टात पोटगी व घटस्फोटाचा दावा दाखल केला आहे. फिर्यादी यांनी त्यांच्याविरुध्द नोंद असलेल्या गुन्हयाबाबतची माहिती प्राप्त करण्यासाठी माहितीच्या अधिकाराखाली पोलीस अधीक्षक, सिंधूदूर्ग व आलोसे उप विभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे अर्ज केले होते.

आरोपी लोकसेवक विठ्ठल अण्णा जाधव उपविभागीय पोलीस अधिकारी, वर्ग—१, सावंतवाडी विभाग, सिंधुदुर्ग यांनी त्या संदर्भात फिर्यादी यांना कार्यालयात बोलावून श्रीमती सातर्डेकर यांनी दाखल केलेल्या केसमध्ये मध्यस्थी करुन श्रीमती सातर्डेकर यांना रु. १५ लाख व आलोसे यांना रु. ५ लाख दयावे लागतील अशी रु. २० लाख रक्कमेच्या लाचेची मागणी करुन ती रक्कम सावंतवाडी मोती तलाव, जिल्हा सिंधूदूर्ग येथे स्वीकारताना आलोसे याना रंगेहाथ पकडण्यात आले.

सदरबाबत कर्जत पो.स्टे. गु.र.नं. २/२०१४, ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.

## २.सीआर/३३०/पुणे/१४

फिर्यादी हे पुणे जिल्हयातील हवेली तालूक्यात रहावयास असून त्यांचेविरुध्द दत्तवाडी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.११४/१४ कलम ४०६, ४२० भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्याचा तपास आरोपी लोकसेवक क्र.१ विठ्ठल शिवाजी शिंगटे, सहा.पोलीस निरीक्षक, वर्ग—२ करीत आहेत. सदर गुन्हयामध्ये जामीनासाठी व प्रकरण मिटविण्यासाठी आरोपी लोकसेवक क्र.१ यांनी प्रथम रु. १० लाखाची मागणी करुन त्यातील रु. ३ लाख स्वीकारले. उरलेल्या लाच रक्कमेपैकी रु.५० हजार लाचेची रक्कम आलोसे क्र.२ दत्तात्रय विठोबा नाईक, पोलीस नाईक, ब.नं. ५५०३, वर्ग—३ यांचेमार्फतीने स्वीकारली.

सदरबाबत दत्तवाडी पोलीस ठाणे, पुणे शहर, भाग—६, गु.र.नं. ३०७१/२०१४, कलम ७, १२, १३(१)(ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून दोन्ही आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.

## ३.सीआर/४७६/नागपूर/१४

फिर्यादी हे नागपूर शहरात रहावयास असून त्यांचेविरुध्द सदर पोलीस ठाणे, नागपूर शहर येथे फसवणूकीचा गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयाचा तपास आरोपी लोकसेवक क्र.१ अरुण बाबूराव माळी, पोलीस निरीक्षक, सदर पोलीस ठाणे, नागपूर शहर यांचेकडे आहे. फिर्यादी यांच्यावर दाखल असलेल्या गुन्हयामधून मुक्त करण्यासाठी आलोसे अरुण माळी यांनी रु. ५ लाख लाचेची मागणी केली. तडजोडीअंती रु. २,५०,०००/– लाचेची रक्कम आलोसे क्र.२ मनोहर रामदास निमजे, पोलीस नाईक ४४९८ यांनी आलोसे क्र.१ अरुण माळी यांचे सांगण्यावरुन स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले.

सदरबाबत पोलीस ठाणे, नागपूर शहर येथे गु.र.क्र.३२८७/१४, कलम ७, १२,१३(१) (ड) सह १३(२) लाप्रका १९८८ नुसार गुन्हा दाखल करुन दोन्ही आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

## ४.सीआर/६९९/मुंबई/१४

फिर्यादी हे खार, मुंबई येथे ट्रान्सपोर्ट आणि रिअर इस्टेटचे काम करतात. त्यांनी आरोरा भवन, शॉप नं.१, १०वा रस्ता, खार(पश्चिम), मुंबई येथील ऑफीस आरोपी क्र. ३) हरीप्रतापसिंग उर्फ विकी आरोरा यांचेकडून खरेदी केले होते. सदरचे ऑफीस पुन्हा आरोपी क्र. ३) विकी आरोरा यांनी फिर्यादीकडे दमदाटी देवून परत मागीतले असता फिर्यादीने खार पोलीस ठाणे येथे धमकी दिल्याबाबत तक्रार केली. त्यानंतर आरोपी क्र. ३) विकी आरोरा यांनी फिर्यादी यांचेशी मैत्री केली. दिनाक ४/६/१४ रोजी आरोपी क्र. ३) विकी आरोरा, आरोपी क्र. ४) महेश कांबळे हे फिर्यादीस डहाणू, जिल्हा ठाणे येथील आरोपी क्र. ३) विकी आरोरा यांचे फार्म हाऊसवर घेवून गेले. तेथे आरोपी क्र.३) यांने फिर्यादीची ओळख पिंकी व पूजा नावाच्या महिलांशी करुन दिली.

दिनांक ३१/०७/२०१४ रोजी खार पोलीस ठाणे येथे नेमणूकीस असलेले लोकसेवक आरोपी क्र.२)सुभाष शंकर सामंत, सपोनि यांनी फिर्यादीस खार पोलीस ठाण्यात बोलावून पूजा नावाच्या महिलेने फिर्यादीचे विरुध्द डहाणू येथील फार्म हाऊसवर सामूहिक बलात्कार केल्याबाबत तक्रार अर्ज केला असून अर्जाची चौकशी

(पुढे चालू.......)

लोकसेवक आरोपी क्र.१ महेद्र नाथ नेर्लेकर, पोलीस निरीक्षक करीत असल्याचे सांगीतले. सदर फिर्यादी यांचेविरुध्द केलेली तक्रार मागे घेण्यासाठी अर्जदार महिला पूजा ही रु. ३ लाखाची मागणी करीत आहे व यामधून मार्ग काढण्यासाठी महिलेचे मित्र आरोपी क्र.३ आरोरा व आरोपी क्र.४ .कांबळे व आरोपी क्र.५ रॉबीन गोन्साल्वीस याना भेटण्यास सांगीतले. नाहीतर फिर्यादीविरुध्द गुन्हा दाखल करुन त्यामध्ये अटक करण्यात येईल असे सांगीतले. तसेच लोकसेवक आरोपी क्र.२) सपोनि सामंत यांनी फिर्यादीस त्यांचे महिला पूजा यांचेबरोबर डहाणू येथील फार्म हाऊसमधील अर्धनग्न अवस्थेतील फोटो दाखविले व आरोपी क्र.१ पोनि नेर्लेकर यांना भेटण्यास सांगीतले. त्याप्रमाणे फिर्यादी पोनि नेर्लेकर यांना भेटले असता त्यांनी तूर्तास केस न दाखल करण्यासाठी फिर्यादीकडे रु. २ लाखाची मागणी केली.

याप्रमाणे फिर्यादी यांना सदर केसमधून मार्ग काढण्यासाठी लोकसेवक आरोपी क्र.२ सपोनि सामंत यांनी तक्रारदार महिलेस रु. ३ लाख व लोकसेवक आरोपी क्र.१ पो.नि नेर्लेकर यांना रु. २ लाख अशी लाचेची मागणी केली. दिनांक १/८/१४ रोजी फिर्यादी यांनी एसीबी, मुंबई येथे तक्रार नोंद केली. त्यानंतर दि. ३/८/१४ रोजी पंचासमक्ष तडजोडीअंती लोकसेवक आरोपी क्र.१ पो.नि नेर्लेकर व लोकसेवक आरोपी क्र.२ सपोनि सामंत यांनी फिर्यादीकडे रु. १० लाख व त्यांचे आरोरा भवन, खार येथील ऑफीसची कागदपत्रे घेवून येण्यास सांगीतले. दिनांक ४/०८/१४ रोजी आरोपी क्र.२ सपोनि सामंत यांचे निवासस्थानी अधिकारी निवासस्थान, क्वॉर्टर रोड, बांद्रा येथे फिर्यादी यांनी पंचासमक्ष आरोपी क्र.२ सपोनि सामंत यांना रु. २०००००/— (रुपये १० लाखाच्या रक्कमेसारखे दिसणारे) बंडल दिले. त्यावेळी आरोपी क्र.२ सपोनि सामंत यांना एसीबी सापळयाचा संशय आला व सपोनि सामंत हे तेथून लाच रक्कमेसह पंचासमक्ष पळून गेले.

यावरुन मुंबई गु.र.क्र.५६/१४, कलम ७, १३(१) (ड) सह १३(२) लाप्रका १९८८ नुसार गुन्हा दाखल करुन सदर गुन्हयात लोकसेवक आरोपी क्र.१) पो.नि नेर्लेकर, २) सपोनि सामंत, आरोपी क्र.३) विकी आरोरा, ४) महेश कांबळे व ५) रॉबीन गोन्साल्वीस यांना अटक करण्यात आलेली आहे.

५.   **सीआर/९२/ठाणे/१५**

आरोपी लोकसेवक शहाजी धोंडूराम जाधव, वय ५५ वर्ष, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नेम. गुन्हे शाखा, वागळे इस्टेट, युनीट ५, ठाणे शहर आणि पो.हवा/५५४३, जयसिंग बाबूसिंग रजपूत, नेम. वरील प्रमाणे यांनी दि. २८/०१/२०१५ रोजी तक्रारदार प्रेमजी फरीआ यांच्या विरूद्ध गुन्हा दाखल न करण्यासाठी व त्यांची कार परत देण्यासाठी त्यांच्या पदाचा दुरूपयोग करून बेकायदेशीर व भ्रष्ट मार्गाने रु. ५,००,०००/— लाचेची मागणी करून तडजोडी अंती रु. १,५०,०००/— स्विकारण्याचे मान्य केले व त्यापैकी रु. ५०,०००/— इतकी लाचेची रक्कम पो.हवा/५४०८ उदय कोरे यांच्या मार्फत दिनांक २८/०१/२०१५ रोजी त्यांचे कार्यालयाजवळ स्विकारून स्वत:चा आर्थिक फायदा करुन घेतला तसेच पो.हवा/५५३७ सुरेश सखाराम पाटील यांनी लाचेची रक्कम स्विकारण्याकरीता त्यांना सहाय्य केले.

वर नमुद चारही लोकसेवक आरोपी यांचे विरूध्द वागळे इस्टेट पोलीस स्टेशन गुरनं. ।। २/२०१५ लाप्रकाक ७, १२, १३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे दि. २९/०१/२०१५ रोजी रात्रौ ००.५५ वा. गुन्हा दाखल केला असून नमुद गुन्ह्यत चारही आरोपी लोकसेवक यांना त्याच दिवशी अटक केली आहे.

आलोसे जयसिंग बाबूसिंग रजपुत, पो.हवा/५५४३ गुन्हे अन्वेषण विभाग ठाणे, रा.— औदुंबर सोसायटी, बी—२/१०३ पोखरन रोड नं—१, शिवाई नगर, ठाणे. (प.) यांचे राहते घरामध्ये एकूण रु.१६३६५००/—ची रोख रक्कम मिळून आली असून सदरची रक्कम जप्त करण्यात आली आहे.

तसेच नमुद आरोपी लोकसेवक यांचे ठाणे भारत सहकारी बॅक लि. ठाणे या शाखेमध्ये त्यांचे नांवे लॉकर आहे, सदर लॉकरमध्ये १२७ तोळे सोन्याचे दागिने मिळून आले असून, रोख रक्कम रु.१,१९,६७०/— मिळून आलेले आहेत. अशी एकूण सुमारे रु.४८,६६,३९५/— मालमत्ता मिळून आली आहे, सदरचे दागिने व रोख रक्कम जप्त करण्यात आले आहेत, तसेच नमुद लोकसेवक यांचे राहते घरी त्यांचे नातेवाईक व स्वत:चे नांवे वाहने तसेच लोकसेवक रजपूत यांचे व त्यांचे पत्नीचे नांवे दोन फ्लॅट व एक शॉप असल्याबाबतची कागदपत्रे मिळून आली आहेत.

## ६. सीआर/१८१/नाग/१५

फिर्यादी यांचा खाजगी व्यावसाय आहे. फिर्यादी यांचे विरूद्ध कार्यालय सहा. पोलीस आयुक्त पाचपावली विभाग, नागपूर शहर यांचेकडे फौजदारी प्रक्रिया संहीता कायद्यान्वये चॅप्टर केसची कार्यवाही सुरू होती, सदरची कार्यवाही बंद करण्याकरीता आरोपी लोकसेवक बाबा भगवान डोंगरे, सहा. पोलीस आयुक्त, पाचपावली विभाग, नागपूर यांनी रु.१०,०००/— लाच रक्कमेची मागणी केली.

दि. २१/०२/२०१५ रोजी आरोपी लोकसेवक बाबा भगवान डोंगरे, सहा. पोलीस आयुक्त, पाचपावली विभाग, नागपूर यांना तक्रारीकडुन रु.१०,०००/— लाच रक्कम स्विकारल्यावरून रंगेहाथ पकडण्यात आले.

सदरबाबत पो.स्टे. जरीपटका, नागपूर शहर येथे अप.क्र. ३१४८/१५ कलम ७, १३(१)(ड), १३(२) ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येवून आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.

## ७.सीआर/१६/गोदिया/१५

फिर्यादी हे हातमजुरी करतात. तक्रारदार यांचे विरूध्द दारूबंदी कायदयान्वये दाखल गुन्हयात अटक केल्यानंतर पी.सी.आर. न घेतल्याचा मोबदला व यापुढेही कार्यवाही न करण्याकरिता आरोपी लोकसेवक क्र. १) उमाकांत काशीराम सरोदे, सहा. पोलीस निरीक्षक, पो.स्टे. गोरेगांव, जि. गोंदिया यांनी रु.५,०००/— लाच रक्कमेची मागणी केली.

दि. ०६/०१/२०१५ रोजी आरोपी लोकसेवक उमाकांत काशीराम सरोदे, सहा. पोलीस निरीक्षक, यांनी आरोपी क्र. २) रविशंकर वसंत माहुरे, नायक पोलीस शिपाई, ब.नं. ५८३, यांचे मार्फतीने तक्रारीकडुन रु. ५,०००/— लाच रक्कम स्विकारल्यावरून रंगेहाथ पकडण्यात आले.

सदर बाबत पो.स्टे. गोरेगाव, जि. गोंदिया अप.क्र. ३००१/१५ कलम ७,१२, १३(१)(ड),१३(२) ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येवून आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.